**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.२१९,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

**सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत.**

अपर मुख्य सचिव ,अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक म्हणून अपेक्षित असलेले सर्व विवक्षित कामकाज हाताळण्यासाठी अनुभवी **उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)** संवर्गातील **एका** उमेदवाराची एक वर्षाकरिता करार पद्धतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्रक्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार करण्यात येणार आहे.

उपरोक्त जाहिरातीबाबतची अधिक माहिती विभागाच्या https://mahafood.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या सेवानिवृत्त उच्चश्रेणी लघूलेखक (मराठी) यांनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज व्यक्तीशः /टपालाव्दारे अथवा napu11.mhpds@mah.gov.in या ईमेल आयडीवर त्यांचा अर्ज दि.०२.१०.२०२५ ते दि.०८.१०.२०२५ पर्यत सादर करावेत.

(अशोक आत्राम)
सह सचिव, अ.ना. पु. व.ग्रा.सं.विभाग
महाराष्ट्र शासन

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.२१९,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

**<u>सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबत.</u>**

मंत्रालयीन विभागातून **उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)** गट ब (अराजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमधून इच्छूक व स्वीय सहायक म्हणून अपेक्षित असलेले सर्व विवक्षित कामकाज करण्यासाठी या विषयीचा अनुभव असलेला **एक** उमेदवार प्राप्त होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्रक्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील विहित केलेल्या तरतूदींनुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

कामकाजाचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल:-

१. अपर मुख्य सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कार्यालयातील स्वीय सहायक म्हणून अपेक्षित असलेले सर्व कामकाज करणे आवश्यक राहील.

२. कार्यालयाचे ठिकाण -

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,

दुसरा मजला, मंत्रालय, विस्तार

मादाम कामा मार्ग, मुंबई-४०००३२

करार पद्धतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती:-

संबंधित उमेदवाराची करार पद्धतीने नियुक्तीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्रक्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूदनुसारच्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील. यामध्ये प्रामुख्याने खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक राहिल.

१. उपरोक्त पदासाठी इच्छुक उमेदवार राज्य शासनाच्या मंत्रालयीन **उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)** पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

३. विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७. उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच या सेवेसाठी त्याच्याकडे क्षमता असावी.

८. उमेदवाराविरूद्ध शासन सेवेत असताना कोणतीही शिस्तभंगविषयक कारवाई झालेली नसावी किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही चालू अथवा प्रस्तावित नसावी.

९. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. नमूना सोबत जोडलेला आहे.

१०.उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. या पत्त्यावर व्यक्तीशः टपालाव्दारे अथवा napu११.mhpds@mah.gov.in या ईमेल आयडीवर दि.०२.१०.२०२५ ते दि.०८.१०.२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठवावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२८२५३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.विहित केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

११.विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जातून पात्र उमेदवारांची संख्या विचारात घेऊन उमेदवार निवडीबाबतची कार्यपद्धती राबविण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांचा राहिल. तसेच या संदर्भातील सक्षम प्राधिकारी यांनी घेतलेले निर्णय व निवड अंतिम असतील. या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अपील अथवा पुन:निर्णयाबाबतचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१२.नियुक्तीच्या कालावधीत सापविलेले विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवारावर राहील. या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र तसेच शासन निर्णयानुसार विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याबाबत बंधपत्र/हमीपत्र देण बंधनकारक राहील.

१३. उमेदवाराला या शासन निर्णयातील तदतूदीनुसार, नियुक्तीच्यावेळी त्याला मिळत असलेल्या सेवानिवृत्ती वेतनाच्या आधारे मासिक पारिश्रमिकाची रक्कम निश्चित करण्यात येईल आणि ती नियुक्तीच्या कालावधीत कायम राहील.

१४. उमदवाराची करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एक वर्षासाठी राहील. तथापि आवश्यकतेनुसार नियुक्तीच्या मुदतीत वाढ करणे किंवा मुदत कमी करण्याबाबतचा निर्णय सक्षम प्राधिकारी यांचा राहिल. मात्र एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

१५. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्रक्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात विहित केल्यानुसार राहतील.

(अशोक आत्राम)
सह सचिव, अ.ना. पु. व.ग्रा..सं.विभाग
महाराष्ट्र शासन.

अर्जाचा नमुना

<u>सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज</u>

फोटो

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :-
२) अर्जदाराचा पत्ता :-
३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-
४) सेवानिवृत्तीच्या वेळचे कार्यालय (सेवानिवृत्तीचे आदेश व पीपीओ प्रत जोडावी) :-
५) भ्रमणध्वणी क्रमांक :-
६) जन्म दिनांक/वय :-
७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय :-
८) अनुभव :-
९) विशेष उल्लेखनीय काम :-

मंत्रालयीन विभागातून **उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)** संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांमधून इच्छूक व स्वीय सहायक म्हणून अपेक्षित असलेले सर्व विवक्षित कामकाज करण्यासाठी या विषयीचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेला **एक** उमेदवार करार पद्धतीने प्राप्त होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्रक्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील विहित केलेल्या तरतूदींनुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

एक वर्षाच्या कालावधीसाठी करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील/सूचनेतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:- मुंबई
दिनांक:- अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

*****